# नियमित दिवाणी दावा क्रमांक ५८/२०२५ मधील नि.क्र.२३ वरील आदेश

(MHAH250001662025)

प्रतिवादी क्र.२ व ३ यांनी सदरच्या अर्जाद्वारे त्यांचेविरुध्द पारीत झालेला विना कैफीयत आदेश रद्दबातल होऊन मिळावा अशी विनंती केली आहे.

२. प्रतिवादींचे अर्जातील कथन असे आहे की, त्यांना महत्वाची कागदपत्रे व माहीती वेळेत उपलब्ध झाली नसल्याने व त्यांना कायद्याचे ज्ञान नसल्याने कैफीयत देता आली नाही. त्यामुळे त्यांच्या विरुध्द विनाकैफीयत आदेश पारीत झाला. प्रतिवादींची कैफीयत येणे आवश्यक आहे अन्यथा प्रतिवादीचे कधीही भरुन नुकसान होणार आहे. त्यामुळे त्यांचेविरुध्द विना कैफीयत आदेश रद्द होवुन मिळण्यासाठी व त्यांची कैफीयत स्विकारण्यासाठी त्यांनी विनंती केली आहे.

३. सदर अर्जावर वादीचे म्हणणे मागविण्यात आले. सदर अर्जावर वादी यांनी आपले म्हणणे देवून असे कथन केले आहे की, कामकाज लांबवण्याचे हेतुने सदर अर्ज दाखल केलाअसुन तो नामंजुर करण्यात यावा. अर्ज मंजुर करावयाचा झाल्यास जास्तीत जास्त कॉस्ट करण्यात यावी असे कथन त्यांनी केले आहे.

४. अर्ज व म्हणणे वाचले. सदरचा दावा वादी यांनी प्रतिवादींविरुध्द खरेदीखत करुन देण्याबाबत, जाहीर ठराव व मनाई हुकुमासाठी दाखल केला असुन प्रतिवादी क्र.२ व ३ यांना दि.२०/३/२०२५ रोजी समन्सची बजावणी झाली असुन ते दाव्यात दि.२४/४/२०२५ रोजी हजर झाल्याचे दिसते. त्यांच्या विरुध्द दि.१३/१०/२०२५ रोजी विनाकैफीयत आदेश पारीत झाला आहे. प्रस्तुतचा अर्ज दि.२/२/२०२६ रोजी दाखल केला आहे. दाव्यातील अभिलेखाचे अवलोकन केले असता प्रतिवादी यांना दाव्याबाबत सन २०२५ मध्ये माहीती होती. असे असताना सुध्दा त्यांनी मुदतीत कैफीयत दाखल केली नाही. तरी सदर दाव्यामध्ये नैसर्गीक न्यायतत्वाच्या दृष्टीने प्रतिवादी यांचे म्हणणे ऐकून घेणे गरजेचे आहे. प्रस्तुतचा अर्ज मंजूर केल्यास व प्रतिवादीचा विना कैफीयत आदेश रद्द करुन व कैफीयत दाखल करण्याची संधी दिल्यास दावा गुणावगुणावर चालुन निकाली होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे प्रतिवादी यांनी केलेल्या विलंबाचा विचार करता वादीला खर्चाची रक्कम देऊन तो विलंब भरुन काढता येईल. सबब, पुढील प्रमाणे

आदेश पारित करणे न्यायोचित होईल.

**आ दे श**

१. प्रतिवादी क्र.२ व ३ यांनी रक्कम रुपये रु.८००/– वादीला खर्च देण्याच्या अटीवर अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी यांनी खर्चाची रक्कम वादीला दिल्यानंतर त्यांच्याविरुध्दचा विना कैफीयत आदेश रद्द करण्यात येवुन त्यांची कैफीयत अभिलेखावर घेण्यात येईल.

३. प्रतिवादी यांनी खर्चाची रक्कम वादीस पुढील तारखेपर्यंत द्यावी.

सही/-

(डॉ.एन.एस.सबनीस)

दिनांकः– ०९/०३/२०२६

सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,

पारनेर.